## जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १७ (प्रतिनिधी) विविधता ही नैसर्गिक असून भेदभाव मात्र मानव निर्मित आहे. लिंगभाव हा आपल्याकडे रूजवला जातो ही मानसिकता बदलण्याची गरज असल्याचे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या दर्शना पवार यांनी व्यक्त केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने सोशल मिडीया आणि लिंगभावन संवेदनशीलता या विषयावर ७ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा झाली यावेळी दर्शना पवार बोलत होत्या. त्या म्हणाल्या की, अनेक जाहिरातींमधून स्त्रियांचा अवमान केला जातो. त्या जाहिराती नाकरण्याचा अधिकार असायला हवा. आपल्याकडे भेदभाव अथवा विषमता यावर भाष्य केले जात नाही. ते परंपरेने चालू असल्याचा समज आहे तो समज विद्यार्थ्यांनी खोडून काढण्याची गरज आहे.

सोशल मिडीयाच्या बाबतीत नोबल फाउंडेशनचे संचालक जयदीप पाटील म्हणाले की, विद्यार्थ्यांनी मोबाईच्या आहारी जावू नये. आहारी गेल्यास चांगले – वाईट विचार करण्याची क्षमता संपुष्टात येते. मानसिक क्षमतेवर परिणाम होतो. आपल्यातील सर्जनशीलता संपते, मुलांपेक्षा पालकच अधिकच आहारी गेले आहेत. त्यामुळे आता मुलांनीच आई वडिलांना मोबाईल वापरू नका असे सांगण्याची वेळ आली आहे. विद्यार्थ्यांनी गरजेपुरता मोबाईल वापरावा. अभ्यासा व्यतीरिक्तचा वेळ मैदानावर घालवावा असेही जयदीप पाटील म्हणाले. यावेळी मंचावर विभागाचे संचालक प्रा. आशुतोष पाटील, केंद्रीय विद्यालयाचे प्राचार्य सोनाकुमार हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुभाष पवार यांनी केले.

**बातमी नं. २**

जळगाव दि. १७ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आरोग्य केंद्राच्या वतीने रेडक्रॉस सोसायटीच्या सहकार्याने रक्तदान शिबीर घेण्यात आले.

विद्यापीठाचे वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील, कुलसचिव डॉ. विनोद पाटील उपस्थित होते. यावेळी १५ दात्यांनी रक्तदान केले. रेडक्रॉस सोसायटीचे डॉ.ए.एम. चौधरी, राजेंद्र कोळी, किरण बावस्कर, उमाकांत शिंपी, सीमा शिंदे, विद्यापीठातील आरोग्य केंद्राचे डॉ. सारंग खाचणे, डॉ. शाजीया शेख व कर्मचाऱ्यांनी परीश्रम घेतले.

……………………………………………………………………………………………………………

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १७ जानेवारी, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी